# शपथनामा

## लोकसभा निवडणूक २०२४

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

# आमची प्रेरणास्थाने



# बांधिलकी संविधानाप्रति

## THE CONSTITUTION OF INDIA

### PREAMBLE

**WE, THE PEOPLE OF INDIA,**
having solemnly resolved to constitute India into a
**SOVEREIGN SOCIALIST**
**SECULAR DEMOCRATIC REPUBLIC**
and to secure to all its citizens:
**JUSTICE,** social, economic and political;
**LIBERTY** of thought, expression,
belief, faith and worship;
**EQUALITY** of status and of opportunity;
and to promote among them all
**FRATERNITY** assuring the dignity of the
individual and the unity and
integrity of the Nation;
**IN OUR CONSTITUENT ASSEMBLY**
this twenty-sixth day of November, 1949, do
**HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO**
**OURSELVES THIS CONSTITUTION.**

प्रस्तावना

# लोकशाही जगविण्यासाठी...

भारतीय प्रजासत्ताकाचा आत्मा जपताना संवादाची भूमिका हवी, लोकशाही कार्यपद्धतीत सामूहिक विचारविनिमयातूनच निर्णय झाले पाहिजेत, यावर आमचा विश्वास आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीला देश सामोरा जात असतानाच गेल्या १० वर्षांची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. गेल्या दहा वर्षांत चित्र असे आहे, की केंद्रातील सत्तारूढ पक्षाला संवाद नको आहे आणि कार्यपद्धती एकाधिकारशाहीची आहे. लोकशाहीत प्रत्येक निर्णय चर्चा आणि संवादातून जन्माला येणे अपेक्षित असते. गेल्या दहा वर्षांत बहुमताच्या गुर्मीतून निर्णय लादण्याची सवंग कार्यपद्धती अनुसरली गेली, असे चित्र आहे. याचे तडाखे देशाच्या अर्थव्यवस्थेला, देशातील शेतकरीवर्गाला, कामगारवर्गाला, मध्यमवर्गाला बसताना दिसत आहेत. या देशातील रचनेत आपल्याला किंमत नाही, अशी भावना अल्पसंख्याकांमध्ये निर्माण झालेली आहे. सरकारी यंत्रणांचा वापर हत्यारासारखा होतो आहे आणि राजकीय विरोध उभा राहूच द्यायचा नाही, अशी मुजोरी सातत्याने दाखविली जाते आहे.

राज्यकारभार करताना सर्व मतप्रवाह विचारात घेऊन निर्णय अमलात आले पाहिजेत, असे संविधानाला अपेक्षित आहे. संविधानाची ही चौकट उखडून टाकण्याचे काम गेली दहा वर्षे अत्यंत बेमुर्वतपणे सुरू आहे. पंतप्रधान माध्यमांशी संवाद करीत नाहीत, सभागृह नेता या नात्याने सभागृहाच्या कामकाजात सहभागी होत नाहीत, असे दारुण चित्र देश पाहतो आहे. संसदेला काडीमोल किंमत आपण देतो, असा संदेश पोहोचविला जातो आहे. राजकीय पक्षांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायची नाहीत, सूचनांचा स्वीकार करायचा नाही, अशा पद्धतीने संसदेत कारभार सुरू आहे. हे चित्र देशाच्या लोकशाहीच्या भवितव्यासाठी घातक आहे. संसदेला वजा करून, 'मुखवटा लोकशाहीचा व राजवट एकाधिकारशाहीची' हीच कार्यपद्धती रुजविण्याचा प्रयत्न सुरू आहे. जनतेच्या हितासाठीच सरकारच्या योजना राबविल्या जातात. आज या योजनांचा लाभ घेणाऱ्यांना मतपेढी म्हणून वापरले जाते आहे. राज्यकारभार करीत असतानाच्या किळसवाण्या वृत्तीचे दर्शन यातून होते आहे. सत्तेचे केंद्रीकरण करण्याची ही कार्यपद्धती देशाच्या लोकशाहीला नख लावणारी ठरताना दिसते आहे.



देशात आणि महाराष्ट्रात कधी नव्हे एवढी अस्थिरता भाजपाच्या कार्यपद्धतीमुळे निर्माण झालेली आहे. महाराष्ट्राची सर्व आघाड्यांवर पीछेहाट होते आहे. हे चित्र पालटविण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. जनतेच्या भावना समजून घेत, विकासाची दिशा काय असावी, याचे आमचे चिंतन सदैव सुरू असते, त्या विचारमंथनातूनच आलेला हा 'शपथनामा' आम्ही सादर करतो आहोत.

शेतकरी या देशाचा कणा आहेत, त्यांचे आंदोलन चिरडून टाकण्याची भूमिका घेतली जाते आहे. विकासाचे धोरण आपल्यासाठी नव्हे, तर उद्योजकांसाठी राबविले जाते आहे, ही भावना सामान्य जनतेच्या मनात बळावत आहे. शेजारील राष्ट्रांचा विश्वास कमाविण्यात आपण कमी पडतो आहोत. अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी जागतिक पातळीवर अनुकूल संधी असताना रोजगारविरहित विकासाचे धोरण राबविले जाते आहे. देशातील तरुणांमध्ये उन्मादाची भावना चेतविली जाते आहे. विरोधकांची सरकारे पाडण्यासाठी राज्यपाल या संस्थेचा हरप्रकारे उपयोग केला जातो आहे.

इतिहासात जेव्हा जेव्हा आव्हानात्मक परिस्थिती उद्‌भवली, तेव्हा तेव्हा महाराष्ट्राने आपली तलवार परजली आहे. विचारांची लढाई लढताना देशाला मार्गदर्शन केले आहे. ही परंपरा चालविण्याची कधी नव्हे तेवढी आज गरज आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेला डिवचायचे, महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात स्थान असलेल्या नेत्यांना पांगळे करायचे, आर्थिकदृष्ट्या संपन्न महाराष्ट्राला दुबळे बनवायचे, महाराष्ट्रातील प्रत्येक राजकीय पक्षाला आपला बटीक करायचे, असेच धोरण राबविले जाते आहे. देशात आणि महाराष्ट्रात कधी नव्हे एवढी अस्थिरता भाजपाच्या कार्यपद्धतीमुळे निर्माण झालेली आहे. महाराष्ट्राची सर्व आघाड्यांवर पीछेहाट होते आहे. हे चित्र पालटविण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. जनतेच्या भावना समजून घेत, विकासाची दिशा काय असावी, याचे आमचे चिंतन सदैव सुरू असते, त्या विचारमंथनातूनच आलेला हा 'शपथनामा' आम्ही सादर करतो आहोत.

**जय हिंद, जय महाराष्ट्र!**



अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार

# दहा वर्षे
# मतदारांची फसवणूक



महागाई

तीव्र बेरोजगारी

शेतकऱ्यांची दुरवस्था

प्रचंड भ्रष्टाचार

कॉर्पोरेट्ससाठी पक्षपाती धोरणे

खासगीकरण

नोटबंदी

सरकारी यंत्रणांचा गैरवापर

महिला आणि अल्पसंख्याकांविरोधात हिंसाचार

पर्यावरणाची हानी करणारा विकास

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

# आम्ही यासाठी कटिबद्ध आहोत...

- स्वयंपाकाच्या गॅसची किंमत ५०० रुपये निश्चित करणार.
- पेट्रोल आणि डिझेलच्या किमती नियंत्रणात ठेवणार.
- इंधन दरासंबंधी राज्य व केंद्र सरकार यांच्यातील रचनेचा फेरविचार करण्यासाठी समिती नियुक्त करणार.
- राज्य सरकारच्या हक्क आणि अधिकारात केंद्राची ढवळाढवळ होण्याची शक्यता असणारे घटनेतील कलम ३५६ रद्द करणार.
- राज्यपालांची नियुक्ती संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी सल्लामसलत करूनच व्हावी, अशी पद्धत आणणार.
- दर पाच वर्षांनी जातनिहाय जनगणना करणार.
- देशातील सर्वात मोठा अल्पसंख्याक गट असलेल्या मुस्लिम समाजाला प्रगतीच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने 'सच्चर आयोगा'च्या शिफारशींची अंमलबजावणी करणार.

# महाराष्ट्राच्या हितासाठी

- मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देणार.
- नागरी भागाला अनुकूल ठरणारी जीएसटीची फेररचना करणार.
- संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आणि नैसर्गिक आपत्तीतील कांदा, कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी आधारभूत व्यवस्था निर्माण करणार.
- कांदा दरात स्थिरता आणण्यासाठी आयात-निर्यात धोरण आखणार.
- मुंबई-गोवा महामार्ग जलद गतीने पूर्ण करणार.
- केंद्र सरकारच्या 'स्मार्ट सिटी' अभियानाची वस्तुस्थिती श्वेतपत्रिकेद्वारे मांडणार.
- स्थलांतरित मजूर-कामगारांच्या कल्याणासाठी आयोगाची स्थापना करणार.
- प्रत्येक महापालिका क्षेत्रात मेडिकल कॉलेजची उभारणी करणार.
- सर्वसामान्यांना आरोग्यव्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी शहरांमध्ये मोहल्ला क्लिनिक उघडणार.

# राष्ट्राच्या हितासाठी

- केंद्राच्या आरोग्य, शिक्षण, सशस्त्र दल इत्यादी विभागांमधील सुमारे ३० लाख रिक्त जागा भरणार.
- सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यासाठी प्रयत्न करणार.
- स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार किमान आधारभूत किमतीला कायदेशीर हमी देणार.
- राष्ट्रव्यापी सामाजिक, आर्थिक आणि जातीय सर्वेक्षणाची मागणी करणार.
- एससी, एसटी आणि ओबीसी आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा काढून टाकण्यासाठी घटनेत दुरुस्ती करण्याची मागणी करणार.
- धार्मिक अल्पसंख्याकांसाठीच्या घटनादत्त मूलभूत अधिकारांचा आम्ही आदर आणि समर्थन करतो.
- 'राष्ट्रीय शिक्षण धोरणा'चा (एनईपी) फेरआढावा घेण्याची मागणी केंद्र सरकारकडे करणार.
- सर्वसामान्यांचे हित, पारदर्शकता आणि दूरगामी आर्थिक हितसंबंध यांवर खासगीकरणाच्या धोरणाच्या होणाऱ्या परिणामांचा आढावा घेणार.
- एकसमान जीएसटी आणून जीएसटीची पुनर्रचना करणार; स्वतंत्र जीएसटी कौन्सिलची स्थापना करणार.
- ईशान्येकडील राज्यांच्या विशेषत: मणिपूरमधील समस्यांकडे, वांशिक प्रश्नांकडे लक्ष देणार.
- जम्मू आणि काश्मीरला पूर्ववत राज्याचा दर्जा तातडीने देणार.
- सर्व नागरिक, लोकशाही संस्था आणि प्रसारमाध्यमे यांची प्रतिष्ठा व हक्क यांचे संरक्षण करणार.
- 'वन नेशन, वन इलेक्शन'ची संकल्पना नाकारणार.

## तरुणाई

**भारताची ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या २५ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील आहे आणि ६५ टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. तरुणाई ही केवळ नोकऱ्या मागणारी न होता नोकऱ्या देणारी व्हावी, यासाठी त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण आणि कार्यानुभवाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, हा आमचा प्रयत्न असेल. त्या अनुषंगाने पुढील मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले जाईल.**

- प्रशिक्षणार्थी उपक्रमाची हमी : २५ वर्षांखालील प्रत्येक पदवीधर आणि पदविकाधारकाला 'राईट टू ॲप्रेंटेसशिप' देणार. १ लाख रुपये विद्यावेतन आणि एका वर्षाचे प्रशिक्षण देणे कंपन्यांना अनिवार्य करणार.
- कौशल्य विकासवाढीस चालना : कौशल्यविकासाद्वारे रोजगारसंधींमध्ये वाढ करणे. व्यावसायिक प्रशिक्षण, डिजिटल साक्षरता, उद्योग-व्यवसायांच्या आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे.
- उद्योजकता विकास : उद्योजकता विकासासाठी स्टार्टअपचे अर्थसाहाय्य वाढविणार.
- नव्या क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मिती : हरित तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, अक्षय आणि शाश्वत ऊर्जा, ॲग्रिबिझनेस, पर्यटन आणि सेवा यांसारख्या नव्या क्षेत्रातील रोजगारनिर्मितीसाठी कौशल्य विकास आणि प्रशिक्षण.
- रिक्त पदांची भरती : केंद्र स्तरावर मंजूर विविध विभागांतील सुमारे ३० लाख रिक्त पदे भरणार.
- स्पर्धा परीक्षा सुधारणा : शासकीय नोकऱ्यांसाठीचे परीक्षा शुल्क रद्द करणार. १ एप्रिल- ३० जून २०२१ या कोरोना कालावधीत लोकसेवा आणि इतर परीक्षांना बसण्याची संधी न मिळालेल्या विद्यार्थ्यांना नव्याने संधी देणार. पेपरफुटीविरोधात कारवाई करून कडक धोरण अवलंबणार.
- युवा पिढीचे सक्षमीकरण : हवामान बदल आणि शाश्वत विकास या संदर्भातील नागरी सहभाग वाढविण्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम, नेतृत्व प्रशिक्षण, शिबिरे या माध्यमातून युवकांचे सक्षमीकरण करणार.
- व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न : क्रीडा, कला इत्यादी क्षेत्रांत तरुणाईला गुंतवून व्यसनाधिनतेपासून दूर ठेवणार.
- तरुणांच्या संधीसाठी प्रगत एआय : मानवाचे कल्याण आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी माणूस व यंत्राला एकत्र आणणाऱ्या भविष्यवेधी तंत्रज्ञानाचा पुरस्कार.
- अध्ययन भवनाची स्थापना : प्रत्येक जिल्ह्यात अत्याधुनिक अभ्यास केंद्राची स्थापना करणार.

## महिला आणि युवती

**राष्ट्राच्या उभारणीत महिला आणि युवतींचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्तर उंचाविण्यासाठीचा मार्ग आम्ही आखत आहोत. त्यांना सुरक्षा, समानता आणि संधी प्रदान करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

### मुलींच्या शिक्षणासाठी गुंतवणूक

मुलींचे शिक्षण, आरोग्य समस्या आणि सुरक्षा यांतील अडथळे दूर करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. मुलींच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीसाठी वसतिगृहासारख्या सुविधा उपलब्ध करून देणार.

### महिला आरक्षण

संसद आणि राज्य विधिमंडळात महिला आरक्षण त्वरित लागू होण्यासाठी प्रयत्न करणार. केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण द्यावे, न्यायव्यवस्थेतील महिलांचे प्रतिनिधित्व वाढवावे आणि अन्य सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना अधिकारपदे दिली जावीत, यासाठी पाठपुरावा करणार.

### आर्थिक सक्षमीकरण

- आरोग्यसेवक, आशा, अंगणवाडी, माध्यान्ह भोजन पुरवठादार या क्षेत्रांत कार्यरत महिलांना केंद्र सरकारतर्फे मिळणारे मानधन दुप्पट करण्यासाठी प्रयत्न करणार.
- वेतनातील भेदभाव रोखण्यासाठी 'समान कामासाठी समान वेतन'.

- संस्थात्मक कर्जाच्या रकमेत भरीव वाढ करणार.
- महिला-उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी महिला प्रमुख असणाऱ्या उद्योग-व्यवसायांसाठी औद्योगिक वसाहतींमध्ये विशेष भूखंड देणार.

**डेटा आणि विश्लेषण**

लिंग समानता आणण्यासाठी या संबंधीच्या प्रगतीचे निरीक्षण करणारी यंत्रणा स्थापन करणार. सर्व मंत्रालयांमध्ये जेंडर बजेटिंग राबविणार.

**सामाजिक समर्थन प्रणाली**

मनुष्यबळातील महिलांचा घटता सहभाग लक्षात घेऊन महिलांसाठी साहाय्यक यंत्रणा उभारण्यासाठी पावले उचलणार. घरगुती हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांसाठी तात्पुरती निवारा केंद्रे, कामासाठी सुरक्षित जागा, बालसंगोपन, ज्येष्ठ महिलांसाठी सेवा-सुविधा, मातृत्व लाभ, वसतिगृहे, रात्र निवारा इत्यादी सुविधा उभारणार.

**सर्वसमावेशक महिला सक्षमीकरण**

- आरोग्य - प्रजनन आरोग्यसेवा, माता आरोग्य, ॲनिमिया, एचआयव्ही, क्षयरोग, स्तन आणि गर्भाशयाचा कर्करोग इत्यादींबद्दल जागरूकता-तपासणीसह परवडणाऱ्या आणि दर्जेदार आरोग्यसेवा पुरविण्यासाठी कटिबद्ध राहणार.
- कायद्याचे बळ - वारसा आणि मालमत्तेच्या अधिकारांसह महिलांच्या कायदेशीर अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी जागरूकता निर्माण करणार. याकरिता यंत्रणा उभी करून कायदेशीर मदत देण्यास बांधील राहणार. कायद्याच्या परिपूर्ण अंमलबजावणीसाठी व्यवस्थेत सुधारणा करणार.
- सुरक्षा आणि निवारण - लैंगिक छळ रोखणाऱ्या कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करून कार्यस्थळी सुरक्षा प्रदान करणारी सक्षम यंत्रणा उभारणार.

**सुरक्षित आधार**

शैक्षणिक केंद्रे, सार्वजनिक स्थळ आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्म या ठिकाणी मुलींना हिंसाचार, शोषण आणि छळापासून सुरक्षा देणार. शाळा-महाविद्यालयांमध्ये सेफ्टी ऑडिट अनिवार्य करणार.

# शेतकरी

**शेतकरी हे आपला अन्नदाते असून, आपल्या अर्थव्यवस्थेचा कणादेखील आहेत. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही आणि चुकीच्या धोरणांचा आणि नैसर्गिक आपत्तींचा फटकाही त्यांना बसतो. त्यांच्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची उत्पादकता, शाश्वतता आणि नफा सुधारण्याच्या उद्देशाने कृषी सुधारणांची अंमलबजावणी करण्याचे वचन आम्ही देतो.**

**योग्य हमी भाव**

- शेतमालाला रास्त आणि किफायतशीर भाव मिळावा यासाठी प्रयत्न करणार.
- स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसीनुसार किमान आधारभूत किमतीची कायदेशीर हमी देणार.
- शेतकऱ्यांसाठी एक आयोग स्थापन करून त्याद्वारे कर्जमाफी, शेतमालाचे आयात-निर्यात धोरण व कायदे, तसेच कृषी धोरणांसाठीच्या शिफारसी यातील समस्यांचे निराकरण करणार.
- कृषी उत्पादनांच्या विक्रीसाठी अनेक पर्याय उपलब्ध करून देणार. उदा. एपीएमसी, शेतकरी-उत्पादक संस्था किंवा वैयक्तिक प्रगतिशील शेतकऱ्यांकडे चालविण्यात येणारे ऑनलाईन मार्केट, आठवडा बाजार किंवा किरकोळ बाजार.
- शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतमालाचे ठोस आयात-निर्यात धोरण तयार करण्याकरिता सरकारकडे पाठपुरावा करणार.
- शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे किंवा धोरणे आखताना त्यांच्याशी सल्लामसलत करणार.

### शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी योजना

- क्रेडिट सुविधेच्या माध्यमातून लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी बिनव्याजी कर्ज, सुलभ आणि परवडणाऱ्या कर्जसुविधा उपलब्ध करणार.
- पीक विमा- नैसर्गिक आपत्ती, कीड आणि पीक निकामी यांमुळे होणाऱ्या नुकसानीपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी सर्वसमावेशक पीक विमा संरक्षणाची हमी देणार.
- ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास, सिंचन, जलस्रोत, अंतर्गत रस्ते, साठवण सुविधा, कार्यक्षम वाहतूक आणि बाजारपेठ यांकडे लक्ष देणार.
- आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा पत्नी आणि मुलांना विशेष साहाय्याबाबत विचार करणार.
- उपजीविकेच्या संधींसाठी दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि मासेमारीला प्रोत्साहन देणार.

### नवोपक्रम, शाश्वत शेती आणि तंत्रज्ञानाचा वापर

- हवामानबदलामुळे पावसाची तीव्रता आणि वातावरणीय बदल झाले आहेत, त्यामुळे कृषी हवामान (CRA) तंत्र समजून घेणे आणि त्यांचे पालन करणे महत्त्वाचे आहे.
- कृषी तंत्रज्ञान, ग्रीन हाऊससाठी हवामान नियंत्रित प्रणाली, शाश्वत शेती पद्धतींना चालना देण्यासाठी आणि कृषी विज्ञान केंद्रांद्वारे आधुनिक शेती तंत्रांसाठी प्रशिक्षण आणि समर्थन देणार.
- पीक पद्धती, अभ्यासपूर्ण शेती, आंतरपीक आणि कृषी वनीकरण, अपारंपरिक पिकांची लागवड, दुष्काळी परिस्थिती इत्यादी समजून घेण्यासाठी अनुकूल उपायांचा अभ्यास आणि अवलंब करण्यासाठी धोरण आखणार.

### सिंचन, पाणी व्यवस्थापन आणि आधुनिक शेती तंत्र

- शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आधुनिक सिंचन, पायाभूत सुविधा आणि जलसंधारणामध्ये गुंतवणूक करण्यासाठी पाठपुरावा करणार, तसेच भूजल पुनर्भरणासाठी तंत्राचा अवलंब करणार.
- पावसाचे पाणी साठविण्यासाठी तलाव, बंधारे, शेततळे बांधणार.
- सिंचनासाठी सौर पंप बसविणार.
- हायड्रोपॉनिकस, ॲक्वापॉनिक्स, पर्माकल्चर, ॲग्रोफॉरेस्ट्री, एकात्मिक कीडव्यवस्थापन पद्धती यासाठी प्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न करणार. फळबाग, मत्स्यपालन, रेशीम शेती, कम्पोस्टिंग, कृषी कचरा यांसारख्या उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे अशा उपाययोजनांसाठी अनुदान देणार.

### ग्रामीण विकास

- शेतजमिनीकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यांचा विकास करणार.
- राष्ट्रीय पेयजल अभियानाच्या अंमलबजावणीला गती देणार.
- पाणी दूषित होणे थांबविणार; प्रदूषणाचे स्रोत व कारणे, आरोग्य व पर्यावरणावर होणारे परिणाम यांचा अभ्यास करून दूषित पाण्याच्या समस्या दूर करणार.

## कामगार

**कामगारांप्रति आमची बांधिलकी अतूट आहे. मजुरांच्या हक्कांचे रक्षण करण्याचे आमचे ध्येय आहे. योग्य वेतन, कामाची सुरक्षित स्थिती आणि त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती मजबूत करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.**

**कामगार हक्क संरक्षण**

- कामगार कायदे मजबूत करण्याची आणि योग्य वेतन, सुरक्षित कामाची हमी (युनियन करण्याचा आणि एकत्रितपणे निर्णय घेण्याचा अधिकार) यांसह कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करणार.
- राहणीमानाला अनुसरून सुसंगत किमान वेतन मानके वेळोवेळी सुधारित करून ती लागू करणार.
- सर्व कामगारांसाठी समान संधी आणि 'समान काम - समान वेतन' सुनिश्चित करणार आणि असमानता दूर करण्यासाठी सकारात्मक कृती कार्यक्रम लागू करणार.
- अनौपचारिक रोजगाराला संबोधित करण्यासाठी धोरणे अमलात आणून नोकरीच्या सुरक्षेची हमी देणार, औपचारिकतेला प्रोत्साहन देणार आणि अनियंत्रित टाळेबंदी व कामगार कपात रोखणार.

**सामाजिक सुरक्षा, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि आरोग्य**

- कामगारांसाठी सर्वसमावेशक सामाजिक सुरक्षा उपायांची स्थापना कणार. यामध्ये बेरोजगारी विमा, आरोग्यसेवा लाभ, निवृत्तिवेतन यांचा समावेश असणार.
- व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य नियमांची अंमलबजावणी करणार. नियमित तपासणी करून आणि सुरक्षा पद्धतींबद्दल प्रशिक्षण देऊन सुरक्षित कामाच्या परिस्थितीची हमी देणार.
- कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाशी संबंधित कायद्याची कठोर अंमलबजावणी सुनिश्चित करणार.
- कामगारांच्या मुलांसाठी पाळणाघर आणि नोकरदार महिलांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी स्वच्छतागृहांची तरतूद सुनिश्चित करणार.

**नावीन्यपूर्ण उपक्रम**

- शहरी भागातील गरिबांसाठी कामाची हमी देणाऱ्या शहरी रोजगार हमी कार्यक्रम राबविणार.
- कामाच्या तासांनंतर 'राईट टू डिस्कनेक्ट'साठी आग्रही मागणी करणार.
- मासिक पाळीच्या रजेचा पर्याय आणि पुरुषांसाठी पालक रजा मिळण्यासाठी आग्रह धरणार.
- कामगारांच्या क्षमता वाढविण्यासाठी, रोजगारक्षमता सुधारण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम आणि व्यावसायिक प्रशिक्षणाचा उपक्रम हाती घेणार.
- 'मनरेगा'अंतर्गत वेतन वाढविणार आणि सार्वजनिक कामांसाठी कामाची व्याप्ती वाढविणार.

**असंघटित कामगार, रस्ते वाहतूक कामगार, सार्वजनिक वाहतूक आणि इतर कामगार**

- असंघटित, रस्ते वाहतूक आणि सार्वजनिक वाहतूक कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी योग्य कायदे आणि धोरणे तयार करणार.
- रस्ते वाहतूक कामगार - या क्षेत्रासाठी सर्व कामगार कायदे लागू करण्याची मागणी करणार, भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम १०६ (१) आणि (२) मधील दंडात्मक तरतूद मागे घेण्याची, तसेच स्वतंत्र तपासाच्या घटनेची मागणी करणार. राष्ट्रीय महामार्गावरील ट्रक विश्रांतीची ठिकाणे, स्वच्छतागृहे इत्यादींमध्ये चालकांसाठी एसी केबिनच्या माध्यमातून चालकांना आराम देणे बंधनकारक करणाऱ्या मोटार वाहन कायद्यातील तरतुदींची त्वरित अंमलबजावणी करणार.
- घरगुती कामगार आणि स्थलांतरित कामगारांच्या रोजगाराचे नियमन करण्यासाठी कायदे आणि धोरणांची मागणी करणार.

**कंत्राटी कामगार आणि बांधकाम कामगार**

- सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांमध्ये कंत्राटी कामगार पद्धतीवर बंदी घालणार.
- कंत्राटी किंवा अनौपचारिक कामगार काम करतात, त्यांच्यासाठी विविध फायदे, नोकरीची सुरक्षा आणि विवाद निराकरणासाठी कायदेशीर संरक्षणाची हमी देणार.
- बांधकाम क्षेत्रातील स्थलांतरित कामगारांसाठी एक सर्वसमावेशक धोरण आखणार.

# उपेक्षित वर्गासाठी

**उपेक्षित वर्गाच्या प्रगतीसाठी आम्ही वचनबद्ध आहोत. सर्व समाजघटकांना समान संधी उपलब्ध झाली पाहिजे, हे आमचे उद्दिष्ट आहे.**

- जाती आणि पोटजातींची गणना करण्यासाठी देशव्यापी सामाजिक, आर्थिक आणि जात सर्वेक्षण करणार.
- अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास वर्गासाठी असणारी ५० टक्के आरक्षण मर्यादा वाढविण्यासाठी घटनादुरुस्ती करणार.
- अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास वर्गासाठी राखीव असलेल्या सर्व रिक्त जागा एक वर्षाच्या कालावधीत भरणार.
- वनहक्क कायदा, २००६ च्या प्रभावी अंमलबजावणीची मागणी करणार.

**कल्याणकारी योजना**

- घर बांधणे, व्यवसाय सुरू करणे आणि मालमत्ता खरेदी करणे यांसाठी अनुसूचित जाती-जमातीच्या व्यक्तींना संस्थात्मक कर्ज देणार.
- अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणातील शिष्यवृत्तीसाठी निधी दुप्पट करणार.
- गरीब, विशेषत: अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा सुरू करणार.
- प्रत्येक जिल्ह्यात अभ्यास केंद्रे आणि ग्रंथालये उभारण्यासाठी पुढाकार घेणार.
- सार्वजनिक आणि खासगी रोजगार आणि शिक्षणामध्ये विविधता प्रस्थापित करण्यासाठी कार्य करणार.
- मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग कायदा, २०१३ च्या तरतुदीची काटेकोर अंमलबजावणी करणार आणि गटारे-मैला साफ करणाऱ्या मशीनच्या खरेदीसाठी तरतूद करणार.
- अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ ची अंमलबजावणी करण्यासाठी हेल्पलाईन सुरू करणार.

# सामाजिक न्याय

**ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान राखला गेला पाहिजे, त्यांची काळजी घेतली गेली पाहिजे. दिव्यांगांचे सक्षमीकरण केले पाहिजे. अल्पसंख्याकांच्या हक्क व संधींची जपणूक झाली पाहिजे. 'एलजीबीटीक्यूआयए-प्लस' वर्गाला कायदेशीर मान्यता मिळून त्यांना समाजाने स्वीकारले पाहिजे. या सर्व मुद्द्यांवर आम्ही समता आणि न्यायाची मूल्ये जपण्याचे वचन देतो.**

**समता**

जात, पंथ, लिंग याच्यासोबतच आर्थिक सुबत्ता आणि मिळणाऱ्या संधी यामध्ये असमानता आहे. अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास वर्ग समुदाय हे देशाच्या लोकसंख्येच्या जवळपास ७० टक्के आहेत. त्यांचे प्रतिनिधित्व अनेक आघाड्यांवर कमी आहे. संपत्तीचे वितरण असमान आहे. समाजातील वाढती विषमता आणि असमानता यांचा परिणाम संपूर्ण राष्ट्राच्या विकासावर होतो. या महत्त्वाच्या पैलूचे निराकरण करण्यासाठी पुढील बाबींवर लक्ष केंद्रित करणार.

- सर्वसमावेशक विकास आणि सार्वजनिक आरोग्य व शिक्षण, सामाजिक सुरक्षा लाभ, रोजगार हमी योजना यांसारख्या सार्वजनिक निधीच्या उच्च दर्जाच्या सेवांसाठी प्रयत्न करणार.
- सामाजिक कल्याण कार्यक्रम तयार करण्यासाठी डेटाचा प्रभावी वापर करणार.

- अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास वर्ग यांच्या आरक्षणावरील ५० टक्क्यांची मर्यादा वाढविण्यासाठी घटनादुरुस्ती करावी आणि या प्रवर्गाच्या टक्केवारीच्या आधारे धोरणात्मक हस्तक्षेप करावा, अशी मागणी करणार.
- अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास वर्गासाठी खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण देण्यासाठी राज्यघटनेत सुधारणा करणारा कायदा करणार.
- पात्रता बदलून शिधापत्रिकेच्या विविध श्रेणी जारी करण्याच्या निकषांवर पुनर्विचार करणार, जेणेकरून अधिकाधिक गरिबांना मोठा लाभ मिळू शकेल.

**ज्येष्ठ नागरिक**

- ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण, संरक्षण आणि सन्मान यांना प्राधान्य देण्याचे आम्ही वचन देतो.
- पालक आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल आणि कल्याण कायदा, २००७ मध्ये प्रलंबित असलेल्या सुधारणांचा पाठपुरावा करणार.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय आयोग स्थापन करणार.
- ज्येष्ठ नागरिक, विधवा आणि दिव्यांग व्यक्तींच्या पेन्शनच्या रकमेत वाढ करण्याची मागणी करणार.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्यसेवा - ज्येष्ठ नागरिकांसाठी परवडणाऱ्या आणि दर्जेदार आरोग्य सेवांसाठी पुढाकार घेणार.
- राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांसाठी विषाणुजन्य किंवा इतर आजारांविरुद्ध लसीकरणाचा समावेश करणार.
- ज्येष्ठ नागरिक निवारा केंद्र, डे केअर सेंटर्स उभारणार.
- राष्ट्रीय स्मृतिभ्रंश धोरण तयार करणार.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या वयानुसार अनुकूल निवास व्यवस्था शहरांमध्ये उभारण्यासाठी प्रयत्न करणार.
- ज्येष्ठांचा सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करणार.
- ज्येष्ठ नागरिकांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण, कायदेशीर मदत देणार.
- आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी विधी सल्ला उपलब्ध करणार.
- आर्थिक सुरक्षा - वाढती पेन्शन, सामाजिक सुरक्षा लाभ, सेवानिवृत्ती बचत योजना, आर्थिक शोषण आणि फसवणुकीपासून पासून संरक्षण.
- सार्वजनिक वाहतूक प्रवास सवलतीत आणखी वाढ करणार.
- वैद्यकीय अभ्यासक्रमात ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित विषयांच्या समावेशासाठी पाठपुरावा करणार.

**दिव्यांग**

समाजाचा सक्रिय सदस्य म्हणून दिव्यांगांना परिपूर्ण आणि स्वतंत्र जीवन जगण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत, याची खात्री करण्यासाठी आम्ही दिव्यांगांचे हक्क, सन्मान आणि समावेशांना प्राधान्य देण्याचे वचन देतो.

- अपंग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६ ची कठोरपणे अंमलबजावणी करणार.
- असिस्टेड लिव्हिंग अँड केअर सेंटर्सची स्थापना आणि सार्वजनिक जागा, इमारत, वाहतूक इत्यादींमध्ये सुलभता निर्माण करणार.
- शैक्षणिक संस्थांमध्ये साहाय्यक सेवा आणि साहाय्यक तंत्रज्ञान उभारणार.
- सकारात्मक कृती धोरणे लागू करून रोजगार संधी उपलब्ध करून देणार.
- दिव्यांगांना व्यावसायिक प्रशिक्षण आणि नोकरी देणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देणार.
- विशेष वैद्यकीय सेवा, पुनर्वसन सेवा आणि साहाय्यक उपकरणांसह आरोग्य सेवांना समर्थन देणार.
- सामाजिक कल्याण कार्यक्रम, सक्षमीकरण व सहभाग आणि कायदेशीर संरक्षण मजबूत करणार.
- दिव्यांगांविषयीची समज आणि त्यांची स्वीकृती वाढण्यासाठी जागरूकता वाढविणार.

## अल्पसंख्याक

- अल्पसंख्याक नागरिकांना कोणत्याही भेदभावाशिवाय शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक रोजगार, सार्वजनिक बांधकाम करार, कौशल्यविकास, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम इत्यादी सर्व संधींचा योग्य वाटा मिळेल, याची खात्री करणार.
- शिक्षण, उपजीविका, खेळ, संस्कृती आदी सर्व क्षेत्रांत सहभाग वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणार.
- भेदभाव न करता त्यांना पतपुरवठा व्हावा, यासाठी वित्त संस्थांकडे पाठपुरावा करणार.
- आर्थिक तरतुदीची मागणी करणार.
- कारागिरांसाठी कौशल्य विकास केंद्रांना प्रोत्साहन देणार, जेणेकरून पारंपरिक कला जिवंत राहतील.
- अल्पसंख्याक वर्गातील पीएच.डी. आणि एम.फिल. विद्यार्थ्यांसाठी मौलाना आझाद फेलोशिप योजना पुन्हा सुरू करणार.

## एलजीबीटीक्यूआयए +

- लैंगिक कल किंवा लिंग ओळख विचारात न घेता एलजीबीटीक्यूआयए + समुदायाला नागरी हक्क, समानता आणि सन्मान प्रदान करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.
- एलजीबीटीक्यूआयए + व्यक्तींचे कायदेशीर अधिकार ओळखण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. उदा. लग्न करण्याचा अधिकार, मुले दत्तक घेणे, आरोग्य सेवांमध्ये प्रवेश इत्यादी.
- एलजीबीटीक्यूआयए + विषयांवर शिक्षकांना प्रशिक्षण देणे, या समुदायातील विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजात सुरक्षित वातावरण मिळवून देणे, त्यांच्यासाठी सर्वसमावेशक शिक्षण उपलब्ध करून देणे यासाठी वचनबद्ध राहणार.
- लिंग-पुष्टी करणारी आरोग्यसेवा, मानसिक आरोग्य समर्थन, एचआयव्ही/एड्स प्रतिबंध आणि भेदभाव न करता उपचारांसह आरोग्यसेवा देणार.
- हेट क्राईम कायदा - एलजीबीटीक्यूआयए + व्यक्तींच्या विरुद्ध पक्षपाताने प्रेरित गुन्ह्यांची सोडवणूक करण्यासाठी विशेष कायद्याची मागणी करणार. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण देणार.
- समाजाला भेडसाविणाऱ्या विविध आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी युवा केंद्रे, समुपदेशन सेवा आणि समर्थन गट यांसाठी पुढाकार घेणार.
- लैंगिक प्रवृत्तीवर आधारित भेदभाव, छळ आणि गुंडगिरी रोखण्यासाठी पोलिस कारवाई करणार. एलजीबीटीक्यूआयए + चा सहभाग असणाऱ्या कार्यस्थळांना प्रोत्साहन देणार.
- सार्वजनिक जागरूकता आणि संवेदना - एलजीबीटीक्यूआयए + घटकाबद्दल जनमानसांत समज वाढविण्यासाठी जागरूकता आणणार.

## पेन्शनधारक

- औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रातील सर्व नागरिकांची आर्थिक सुरक्षा टिकवण्यासाठी सर्वसमावेशक रोजगार पेन्शन योजना राबविणार.
- सेवानिवृत्तांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणार. सन्मानजनक जीवन देणार. वृद्धापकाळातील गरिबी-निराधारपणापासून त्यांना संरक्षण देणार.
- अर्थपूर्ण पेन्शन लाभ प्रदान करताना हे योगदान परवडणारे आहे का, याची खात्री करण्यासाठी नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणांमध्ये वाढ करणार.
- नोकऱ्या आणि भौगोलिक स्थानांना अनुसरून बदल्यांचा विचार करणार.
- पेन्शन निधीच्या व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणणार.
- 'रोजगार पेन्शन योजने' (ईपीएस) बाबत पेन्शनधारकांची चिंता दूर करण्यासाठी वचनबद्ध आहोत.
- महागाई आणि वाढत्या राहणीमानाच्या खर्चासाठी निवृत्तिवेतनाच्या रकमेचा नियोजनात्मक आराखडा तयार करणार.
- पेन्शनधारक, सेवानिवृत्त आणि संबंधित भागधारकांशी त्यांच्या समस्या आणि दृष्टिकोन समजून घेण्यासाठी सल्लामसलत करणार.

# आरोग्य

**आरोग्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, असे आम्ही मानतो. आम्ही अशा भविष्याची कल्पना करतो, जेथे प्रत्येक नागरिकाला सर्वसमावेशक आणि मोफत आरोग्यसेवा उपलब्ध असतील. सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये सार्वत्रिक मोफत आरोग्यसेवा, ग्रामीण वैद्यकीय सुविधांना मजबूत करणे आणि प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची स्थापना करणे, हे आमचे धोरण आहे. आरोग्य सेवेतील मनुष्यबळामध्ये वाढ करणे, परवडणाऱ्या औषधांची उपलब्धता वाढविणे आणि प्रतिबंधात्मक वैद्यकीय इलाज मिळवून देणे यांसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

- २०२८-२९ पर्यंत आरोग्यासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद ४ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी प्रयत्न करणार.
- सर्व सार्वजनिक आरोग्य केंद्रे, दवाखाने आणि रुग्णालयांमध्ये आरोग्यसेवा मोफत करण्याची मागणी करणार.
- ग्रामीण आणि पुरेशी सेवा नसलेल्या भागात आरोग्यसेवेच्या पायाभूत विकासासाठी आणि आधुनिकीकरणासाठी पुढाकार घेणार. ग्रामीण भागात सेवा देणाऱ्या डॉक्टरांना निवासस्थान आणि विशेष भत्ता देण्याचा आग्रह धरणार.
- प्रत्येक जिल्ह्यात संलग्न रुग्णालय असलेले एक मेडिकल कॉलेज सुरू करणार.
- आरोग्यसेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी डॉक्टर, आरोग्यसेवातज्ज्ञ, परिचारिका आणि संबंधित आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांची भरती करणार.
- जेनेरिक औषधांच्या वापरास प्रोत्साहन, औषधांच्या किमती नियंत्रित करणे आणि आवश्यक औषधे आणि वैद्यकीय उपकरणांवरील शुल्क कमी करून परवडणाऱ्या औषधांसाठी धोरण राबविणार.
- निरोगी जीवनशैली आणि रोगप्रतिबंधकांना प्रोत्साहन देण्यासाठी लसीकरण कार्यक्रम, आरोग्य तपासणी आणि आरोग्य जागरूकता मोहिमांसह प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा उपायांच्या जाहिरातींसाठी पुढाकार घेणार.

**रोगनियंत्रण आणि व्यवस्थापन धोरण**

- रोगनियंत्रण प्रणाली व त्यावरील प्रतिसाद यंत्रणा मजबूत करणार. नव्याने उद्‌भवणारे संसर्गजन्य रोग आणि आरोग्य आव्हानांचा सामना करण्यासाठी संशोधन आणि विकासाकडे अधिक लक्ष देणार.
- कर्करोग, क्षयरोग, संसर्ग नसणारे रोग इत्यादी आजारांना मिशन मोडवर आणणार.

**सुदृढ बालक आरोग्य धोरण**

- आघाडीच्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या (उदा. आशा, अंगणवाडी, माध्यान्ह भोजन स्वयंपाकी आदी) वेतनासाठीचे केंद्र सरकारचे योगदान दुप्पट करणार.
- बालकांमध्ये रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्यासाठी पूर्ण लसीकरण कार्यक्रम हाती घेणार.
- पोषणतत्त्वांच्या कमतरतेमुळे बालकांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्येला आळा घालण्यासाठी प्रभावी कार्यक्रम राबविणार.

**आरोग्य विमा**

- सरकारी किंवा अनुदानित विमा योजनांद्वारे नागरिकांसाठी परवडणाऱ्या आरोग्य विम्याची मागणी करणार.

**डॉक्टर आणि वैद्यकीय व्यावसायिकांची सुरक्षा**

- कर्तव्य बजावत असताना डॉक्टर आणि इतर आरोग्य सेवकांविरुद्ध हिंसक कृत्ये करणे हा गुन्हा ठरविणारा कायदा करणार.

# शिक्षण

**बालपणापासून ते उच्च माध्यमिक शालेय शिक्षणापर्यंत शिक्षणाचा हक्क सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शिक्षणाचा हा प्रवास अखंडित असला पाहिजे, यावर आमचा भर असेल. 'राष्ट्रीय शिक्षण धोरणा'चा पुनर्विचार करणे, अन्यायकारक शुल्क रद्द करणे, शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे आणि संपूर्ण शिक्षणाची गुणवत्ता व सर्वसमावेशकता वाढविणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.**

### दर्जेदार शिक्षण मिळण्याचा प्रत्येक बालकाचा हक्क

- शिक्षण हक्क कायदा, २००९ मध्ये सुधारणा करून इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिक्षणाचा अधिकार वाढविण्यासाठी प्रयत्न करणार.
- बाल्यावस्थेपासून ते सहा वर्षे वयोगटापर्यंत, अर्ली चाईल्डहूड केअर अँड एज्युकेशन (ECCE) कार्यक्रमांचा विस्तार आणि बळकटीकरण करणे. त्यानुसार पायाभूत सुविधांचा विकास, मनुष्यबळनिर्मिती, सर्व मुलांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि जागरूकतेसाठी प्रयत्न करणार.
- शैक्षणिक गळती रोखण्यासाठी शालेय शिक्षणात एकात्मिक धोरण राबविणार.
- 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'त (NEP) सुधारणा आणि नियोजनात राज्यांनाही सहभागी करून घेणार.

### शिक्षणातील अडथळे दूर करणे

- खासगी शाळांमधील विविध शीर्षकांखाली विशेष शुल्क आकारण्याची प्रथा बंद करणार.
- पारदर्शक शैक्षणिक शुल्क धोरण राबविणार.
- कंत्राटी शिक्षक भरतीऐवजी रिक्त पदे भरून त्यांना नियमित करणार. शिक्षकांना अशैक्षणिक कामांसाठी नियुक्त करण्याची प्रथा बंद करणार.
- शैक्षणिक क्षेत्रातील उणिवा दूर करण्यासाठी विशेष उपाययोजना करणार.

### सर्वसमावेशक, दर्जेदार आणि परवडणारे शिक्षण

- राज्य सरकारांच्या समन्वयातून केंद्रीय विद्यालये आणि नवोदय विद्यालयांच्या संख्येत वाढ करणार.
- एससी, एसटी, ओबीसी, ईडब्लूएस, अधिसूचित जमाती आणि अल्पसंख्याकांसह वंचित गटांसाठी असणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना अधिक सक्षम करणार.
- दिव्यांगांच्या सर्वसमावेशक शिक्षणाकरिता प्रभावी धोरण राबविणार.

### महाविद्यालयीन शिक्षण

- प्रत्येक तालुक्यात एक सरकारी महाविद्यालय स्थापन करण्यासाठी राज्य सरकारांना मदत करण्याची मागणी करणार. या महाविद्यालयात मॅन्युफॅक्चरिंग, तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्र उद्योगासाठी कौशल्ये पुरविणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणावर भर देणार.
- इंटरनेटयुक्त ग्रंथालये सुरू करणार.
- केंद्रीय विद्यापीठे आणि इतर केंद्रीय शैक्षणिक संस्थांमधील सर्व रिक्त पदे भरणार.

### अन्य महत्त्वाची धोरणे

- उच्च शैक्षणिक संस्थांच्या मान्यतेसाठी निकष नियमावली ही योग्य व कठोर ठेवणार.
- NEET, CUET इत्यादी केंद्रीय स्तरावर आयोजित पात्रता परीक्षांच्या धोरणाचे पुनरावलोकन करणार.
- खासगी कोचिंग क्लासेससाठी नियमावली ठरवून देणार.
- शैक्षणिक पाठ्यपुस्तके ही संविधानात नमूद केल्याप्रमाणे देशाची मूल्ये आणि आचारसंहितेशी सुसंगत आहेत, याची खात्री करण्यासाठी अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन करणार.

# क्रीडा

**भारताच्या उज्ज्वल क्रीडा परंपरेचे संवर्धन करण्यासाठी आणि निरायम आरोग्य संस्कृती रुजविण्यासाठी क्रीडा क्षेत्राचा सर्वसमावेशक विकास झाला पाहिजे, हा आमचा दृष्टिकोन आहे. त्या दृष्टीने आमच्या 'शपथनाम्या'त उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक वातावरण यांसाठी जागतिक पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याचे वचन आम्ही देतो. तळागाळातील टॅलेंट ओळखून त्याला संधी देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.**

- क्रीडांगण, प्रशिक्षण सुविधा, स्पर्धांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा आणि अत्याधुनिक क्रीडा संकुल व पायाभूत सुविधांच्या विकासाची मागणी करणार.
- तळागाळातील युवकांमधील क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षण देणार.
- होतकरू खेळाडूंसाठी शिष्यवृत्ती, प्रशिक्षण अनुदान आणि प्रोत्साहनपर उपक्रम राबविणार.
- शालेय अभ्यासक्रमात खेळांच्या एकत्रीकरणाची मागणी करणार. सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण आणि क्रीडा उपक्रमांमधील सहभागाकरिता प्रोत्साहित करणार.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या निष्णात खेळाडूंना प्रशिक्षण शिबिरांसाठी निधी देणार.
- क्रीडा विज्ञान आणि क्रीडा विज्ञानातील संशोधन व विकासाला चालना देणार.
- सुदृढ आरोग्य आणि मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून समाजातील सर्व वयोगटांमध्ये खेळांविषयी जागरूकता निर्माण करणार.
- आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी आग्रही राहणार.

# पायाभूत सुविधा

**पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मजबूत योजना तयार करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. नावीन्यपूर्ण कल्पना आणि शाश्वत विकासाला चालना देण्याचा उद्देश यापाठीमागे आहे. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील धोरणात्मक भागिदारीद्वारे, आम्ही आर्थिक समृद्धी आणि पर्यावरणीय शाश्वता प्रदान करणाऱ्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी वचनबद्ध आहेत.**

- सार्वजनिक-खासगी भागीदारीसह जागतिक गुणवत्तेच्या, अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करणार.
- कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी आणि आर्थिक प्रगतीसाठी रस्ते, रेल्वे, बंदरे आणि विमानतळ यांसह वाहतूक व्यवस्था सक्षम करणार.
- शाश्वत शहरीकरणासाठी आणि शहरांमधील जीवनमान सुधारण्यासाठी पाणीपुरवठा, सांडपाणी प्रक्रिया, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, गृहनिर्माण आणि नैसर्गिक अधिवास असणाऱ्या ठिकाणांसह शहरी पायाभूत सुविधा वाढविणार.
- जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी, हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी आणि ऊर्जा सुरक्षा प्राप्त करण्यासाठी सौर-पवन अशा अपारंपरिक अक्षय ऊर्जा पायाभूत सुविधांना प्रोत्साहन देणार.
- डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत करणार. ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी आणि डिजिटल सेवा सक्षम करण्यासाठी डिजिटल आधारित नवकल्पना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणार.
- आरोग्य क्षेत्राशी संबंधित पायाभूत सुविधा सुधारणार. सार्वजनिक आरोग्यसेवा सुधारण्यासाठी रुग्णालये, दवाखाने आणि वैद्यकीय सुविधा दर्जेदार करणार.

- शाळा-महाविद्यालयातील व्यावसायिक आणि कौशल्य विकास केंद्रे सुधारणार.
- ग्रामीण पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणार. सिंचन व्यवस्था, कृषी साठवण सुविधा, उत्पादकतेला आधार देण्यासाठी ग्रामीण रस्ते, ग्रामीण जीवनमान आणि सर्वसमावेशक विकास करणार.
- पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी जलसंधारण प्रकल्प, वनसंवर्धन, जलस्रोतांचे बळकटीकरण, पर्यावरणपूरक पायाभूत सुविधांचा विकास यांना प्राधान्य देणार.

## उद्योग

**उद्योग हा आर्थिक विकास व नवनिर्मितीचा कणा आहे. राष्ट्रनिर्माणाचा महत्त्वाचा पाया म्हणजे उद्योग. या दृष्टीने सुव्यवस्थित नियम, नोकरशाहीतील अडथळे कमी करणे, गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे या माध्यमातून औद्योगिक विकासाला चालना देणे आणि स्पर्धात्मकता वाढविणे, हे आमचे ध्येय आहे.**

- औद्योगिक विकासात सातत्य - नियमांची सुव्यवस्थित आखणी करणार. नोकरशाहीतील अडथळे कमी करणार. गुंतवणुकीस प्रोत्साहन देणाऱ्या सोयीसवलती देऊन व्यवसायानुकूल वातावरणनिर्मिती करणार.
- व्यवसाय सुलभता - 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' अर्थात व्यवसाय-उद्योगांसाठीची प्रकिया सुलभ करणार.
- सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगांना प्रोत्साहन - सूक्ष्म-लघु-मध्यम (एमएसएमई) उद्योगांच्या भरभराटीसाठी त्यांना वित्तसाहाय्य, सवलती, बाजारपेठेची उपलब्धता यांसाठी मदत करणार.
- परकीय गुंतवणूक आणणे - थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करण्यासाठी देशांतर्गत अनुकूलता निर्माण करणार, गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देऊन स्थानिक-आंतरराष्ट्रीय भागिदारीस चालना देऊन वातावरण तयार करणार.
- पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक - औद्योगिक विकास, उद्योगांची कार्यक्षमता वाढविणार, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी पाणी, ऊर्जानिर्मिती, रस्ते, जमीन, बंदरे, विमानतळ इत्यादी पायाभूत सुविधांचा विकास करणार. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गुंतवणूक करणार.
- संशोधन व मनुष्यबळ विकास - संशोधन आणि मनुष्यबळ विकासासाठी गुंतवणूक करणार. प्रशिक्षित, कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्मितीस चालना देणार, उद्योग-शिक्षण संस्था यांच्यातील भागिदारी वाढविणार.
- उत्पादन क्षेत्राचे पुनरुज्जीवन - देशांतर्गत उत्पादन क्षेत्राची वृद्धी होण्यासाठी ऑटोमोटिव्ह, इलेक्ट्रॉनिक्स, टेक्सटाईल, फार्मास्युटिकल्स यांसारख्या क्षेत्रांच्या विकासाला चालना देणार. उत्पादन क्षेत्राचे मूल्यवर्धन करणार. स्पर्धात्मकता आणि गुंतवणूक वाढविणार.
- शाश्वत औद्योगिक पद्धत - पर्यावरणपूरक औद्योगिक विकासाला चालना देऊन शाश्वत विकासाचे धोरण अवलंबणार. जमीन, जल, जंगल, हवा यांचे प्रदूषण-नुकसान टाळण्यासाठी ऊर्जा कार्यक्षमता, ऊर्जावापर, कचरा-सांडपाणी प्रक्रिया इत्यादी उपायांची काटेकोर अंमलबजावणी करणार.

## तंत्रज्ञान

**आजच्या डिजिटल युगात भारताच्या प्रगतीमध्ये तंत्रज्ञानाचा वाटा सिंहाचा राहणार आहे. तांत्रिक प्रगती साधलेल्या अशा भारताचे स्वप्न आम्ही पाहत आहोत, जेथे नवोन्मेष बहरलेला असेल, सर्व नागरिक सक्षम असतील आणि संधींची उपलब्धता प्रचंड असेल.**

- सर्वांसाठी डिजिटल पायाभूत सुविधा - हाय-स्पीड इंटरनेट ॲक्सेस आणि सिक्स-जी नेटवर्कचा देशव्यापी विस्तार करून डिजिटल अंतर भरून काढणार आणि धोरणात्मक गुंतवणुकीद्वारे आर्थिक विकासाला चालना देणार.
- भविष्यासाठी कौशल्ये - प्रत्येक भारतीयाला डिजिटल साक्षरतेने सुसज्ज करणार. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश शिक्षणात करणार.

- नवोपक्रम आणि उद्योजकता - उदयोन्मुख तंत्रज्ञानातील गुंतवणूक वाढावी या उद्देशाने स्टार्टअप्स, लहान व्यवसाय आणि संशोधन संस्थांना प्रोत्साहन देणार.
- डेटा प्रशासन आणि गोपनीयता - नागरिकांच्या गोपनीयतेचे संरक्षण करण्यासाठी, पारदर्शकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि डेटा वापर सुनिश्चित करण्यासाठी मजबूत डेटा प्रशासन कायदे करणार.
- डिजिटल गव्हर्नन्स आणि सेवा वितरण - प्रशासकीय प्रक्रियांचे आधुनिकीकरण करणार. तंत्रज्ञानाद्वारे सार्वजनिक सेवा वितरणात सुधारणा करून लोकसहभाग वाढविणार.
- पर्यावरणीय शाश्वतता - संतुलित आर्थिक विकासासाठी हरित तंत्रज्ञानातील गुंतवणूक वाढविणार. शाश्वत पद्धतींचा प्रचार करणार.
- डिजिटल समावेशकता आणि सामाजिक समता - उपेक्षित समुदायांना प्राधान्य देणार, डिजिटल संसाधनांचा वापर सर्वांसाठी समान ठेवणार, त्यामुळे वंचितांना सामाजिक-आर्थिक प्रगतीच्या जास्तीत जास्त संधी खुल्या होतील.
- तंत्रज्ञानातील जागतिक नेतृत्व - आंतरराष्ट्रीय भागीदारी वाढविणार. भारताच्या एआय आणि ब्लॉकचेन क्षेत्रातील कौशल्याला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देणार. मानवतेच्या भल्यासाठी भविष्यातील तंत्रज्ञानाला चालना देणार.

# अर्थव्यवस्था आणि कररचना

**विकास, नावीन्य आणि सर्वसमावेशकता यांची पूर्तता करणारी मजबूत अर्थव्यवस्था देशाला देणे, हा आमचा आर्थिक अजेंडा आहे. नियोजनबद्धरीत्या आखलेल्या धोरणांच्या आधारे आर्थिक विकासाला चालना देण्याचा, गुंतवणूक आकर्षित करण्याचा आणि समाजातील सर्व घटकांसाठी रोजगार संधी निर्माण करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना वित्तपुरवठा, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेतील प्रवेशासाठी साहाय्य यांसाठी पाठबळ देण्याकरिता आम्ही वचनबद्ध आहोत.**

- कर प्रणालीत फेरबदल - एकल जीएसटी दर लागू करणारी सुधारणा आणून निःपक्ष, पारदर्शक आणि विकासभिमुख करप्रणाली निश्चित करणार. स्वतंत्र, वैधानिक स्वरूप असणारी जीएसटी परिषद स्थापन करणार.
- जीवनावश्यक वस्तू जीएसटीमुक्त - कृषी आणि शैक्षणिक साहित्यावर शून्य जीएसटी आकारणी करणार.
- एमएसएमईना कर सवलत - सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) विकासासाठी कर सवलत लागू करणार.
- 'पिंक टॅक्स'ची कल्पना - किमतींमधील लिंगआधारित असमानता काढून टाकणार. समान कार्यक्षमता असूनही महिलांना संधीपासून वंचित राहावे लागू नये, याकडे लक्ष देणार.
- पारदर्शक कर धोरण - जबाबदार कर धोरण तयार करण्यासाठी भागधारकांशी सल्लामसलत करणार, नियोजित कर सुधारणा पारदर्शकतेने संबंधित घटकांपर्यंत पोहोचविणार.
- विकास आणि नावीन्याला प्रोत्साहन - आर्थिक विकासाला चालना देणारी धोरणे राबविणार, गुंतवणूक आकर्षित करणार आणि समाजातील सर्वांसाठी रोजगार निर्मिती करणार. स्टार्टअप्सना आणि स्वयंरोजगाराच्या संधींना प्रोत्साहन देणार.
- आर्थिक जबाबदारी - आर्थिक पातळ्यांवर स्थैर्य कायम ठेवण्यासाठी आणि सार्वजनिक कर्जे नियंत्रित करण्यासाठी जबाबदार वित्तीय व्यवस्थापनावर भर देणार.
- कृषी विकास - कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गुंतवणूक करणार. कृषी उत्पादकता आणि अन्नसुरक्षेची हमी देण्यासाठी कृषी संशोधन आणि मनुष्यबळ विकासाला चालना देणार.
- निर्यातीला चालना - व्यापारासाठीच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणार. भारतीय वस्तू आणि सेवांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देणार, निर्यात बाजारातील अडथळे कमी करणार.

- धोरणात्मक विकास - आर्थिक व्यवहारांना चालना देण्यासाठी आणि उत्पादकता वाढविण्यासाठी वाहतूक, ऊर्जा आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा धोरणात्मक विकास करणार.
- खासगीकरण धोरणाचा फेरआढावा - खासगीकरणामुळे झालेल्या परिणामांचा अभ्यास करणार. सार्वजनिक क्षेत्रातील खासगीकरण थांबवून त्याचा आढावा घेणार.
- सार्वजनिक क्षेत्रांचे रक्षण - महत्त्वाच्या सार्वजनिक क्षेत्रांचे खासगीकरण न होऊ देता त्यांची मालकी सार्वजनिकच ठेवण्याचे धोरण स्वीकारणार. या सार्वजनिक क्षेत्रांची कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी व्यवस्थापन सुधारणार.
- सार्वजनिक कामगार क्षेत्राला संरक्षण - खासगीकरणाचा फटका बसलेल्या कामगारांच्या जॉब सिक्युरिटीचे आणि हक्कांचे रक्षण करणार.

# नागरी विकास

**नागरी विकासाचा आमचा दृष्टिकोन सर्वसमावेशक आणि भविष्यवेधी आहे. अत्यंत वेगाने होणाऱ्या नागरीकरणाच्या काळात प्रत्येक नागरिकाला उत्तम जीवनमानाची खात्री देणे आणि पर्यावरणपूरक शाश्वत विकास करणे, हे आव्हान आम्ही पेलणार आहोत. नागरिकांना उत्तम संधी, सुखद जीवनशैली देणारी शहरे घडविण्यासाठी स्थानिक संस्थेच्या माध्यमातून आम्ही काम करू.**

- नागरी विस्तार नियमन - शहरांच्या बकाल वाढीवर नियंत्रण ठेवणार. किती नागरिकांना सामावून घेण्याची शहराची क्षमता आहे, पायाभूत सुविधा किती प्रमाणात पुरविल्या जाऊ शकतात, याचे मूल्यांकन करून शहर प्रशासन व्यवस्था सुधारणार.
- महापालिका 'केडर' निर्मिती - शहरांच्या उत्तम व्यवस्थापनासाठी विशेष महापालिका केडर (खास, प्रशिक्षित मनुष्यबळ) स्थापनेची मागणी करणार.
- शहरीकरण धोरण - शहर विकासासाठी सर्वसमावेशक धोरण आखणार.
- हवामानपूरक शहरे - हवामानबदलाच्या काळात शाश्वत शहर नियोजन महत्त्वाचे झाले आहे. सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याची क्षमता असणारे व्यवस्थापन शहरांमध्ये तयार करणार.
- हवामानपूरक विकासाची जाण - प्रत्येक विकास प्रकल्प हवामानबदलाचे संभाव्य परिणाम आणि शाश्वतता यांच्या कसोटीवर उभारला गेला पाहिजे, यावर लक्ष देणार. प्रत्येक विकास प्रकल्पाकडे हवामानबदलांच्या प्रभावाच्या दृष्टिकोनातूनच पाहण्याची मागणी करणार.
- शाश्वत नगर नियोजन - हवा, पाणी, जमीन, वृक्षसंपदा, हवामानबदल, नैसर्गिक आपत्ती या सर्व घटकांचा विचार करून शहर विकासाचे नियोजन झाले पाहिजे. नागरी, व्यावसायिक संकुले, दळणवळणाची साधने, सार्वजनिक वाहतूक सेवा, उद्याने, रुग्णालये, कचरा-सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते, पादचाऱ्यांसाठी मार्ग इत्यादी सर्व विकास कामे पर्यावरणपूरक झाली पाहिजेत, यावर भर देणार.
- आधुनिक नागरी सुविधा - शहरांमधील वाढत्या लोकसंख्येची गरज पूर्ण करण्यासाठी मल्टी-मोडेल वाहतूक व्यवस्था, स्वच्छ पाणीपुरवठा, कचरा व सांडपाण्याची शास्त्रोक्त विल्हेवाट, पाण्याचा पुनर्वापर, रेन वॉटर हार्वेस्टिंग इत्यादी पर्यावरणपूरक पर्यायांचा आग्रह धरणार.
- निवास आणि परिसर विकास - नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध झाली पाहिजेत, झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन झाले पाहिजे, शहरात ऑक्सिजनची बेटे तयार झाली पाहिजेत, या प्रमुख मुद्द्यांवर भर देणार.
- नागरी हरित पट्टे - विकास प्रकल्प, नागरी आणि व्यावसायिक संकुले यांमुळे सिमेंटच्या जंगलात शहरे हरवून जाणार नाहीत, याची काळजी घेणार. शहरांमधील जैवविविधतेचे संरक्षण, उद्याने-वनक्षेत्र-जलस्रोत यांचे संवर्धन यांवर भर देणार, जेणेकरून नागरिकांना उत्तम आरोग्य लाभेल.
- आर्थिक संधीची निर्मिती - गरिबी निर्मूलनासाठी शहरांमध्ये स्वयंरोजागाराच्या संधी निर्माण करणार. रोजगार निर्मितीची धोरणे राबविणार.

- तंत्रज्ञानाधिष्ठित नागरी सेवा - नागरी सेवा तत्पर होण्यासाठी आणि प्रशासन गतिमान होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार. नागरिकांच्या तक्रारींची दखल त्वरित घेतली जाऊन त्या सोडविल्या जाव्यात यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणार.
- प्रशासन आणि लोकसहभाग - प्रशासन लोकाभिमुख आणि पारदर्शक करणार. शहर विकासाच्या निर्णयप्रक्रियेत नागरिकांचा सहभाग घेणार.

# पर्यावरण

**भारताला सध्या गंभीर पर्यावरणीय समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. जगातील सर्वात ५० प्रदूषित शहरांमध्ये ४२ भारतीय शहरांचा समावेश आहे, यावरून या बिकट स्थितीची कल्पना यावी. तीव्र हवामानबदलांच्या परिणामांमुळे भारतातील पर्यावरण, शेती, जलस्रोत, वनक्षेत्र आणि नागरी वस्त्या प्रभावित झाल्या आहेत. जागतिक तापमानवाढ (ग्लोबल वार्मिंग) आणि हवामानबदल (क्लायमेट चेंज) यांचे गंभीर होत चाललेले स्वरूप पाहता पर्यावरणसंवर्धन, पर्यावरणरक्षण यांकडे तातडीने लक्ष देण्याची नितांत गरज आहे. सध्याच्या आणि येणाऱ्या पिढ्यांसाठीचा भारत 'सुजलाम, सुफलाम, मलयज शीतलाम... शस्य श्यामलां' राखण्यासाठी पर्यावरणसंवर्धन आणि रक्षणाकडे लक्ष देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.**

- 'नेट झीरो' उत्सर्जन - शून्य कार्बन उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर, कर्बरहित स्थितीकडे उद्योगांची वाटचाल, शाश्वत पायाभूत सुविधा हे उद्दिष्ट गाठावे लागेल. या दृष्टीने सरकारी धोरणे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक सोयी-सवलती आणि लोकसहभाग यांच्या आधारे सर्वसमावेशक रणनीती आखणार.
- हवामान कृती आराखडा - हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे, अक्षय ऊर्जास्रोतांचा वापर वाढविणार, तसेच ऊर्जा कार्यक्षमता व बचत वाढविणार.
- परिसंस्थेचे संवर्धन - जैवविविधतेचे संरक्षण, परिसंस्थांचे पुनरुज्जीवन, जंगलतोडीला प्रतिबंध, वनीकरण आणि पर्यावरणपूरक जमीन वापर यावर भर देणार.
- जल-वायू गुणवत्ता - औद्योगिक संस्थांकडून होणाऱ्या जल-वायुप्रदूषणावर कडक निर्बंध घालणार, हरित-प्रदूषणमुक्त वाहतूक सेवेस चालना देणार आणि सांडपाणी व्यवस्थापन व जलपुनर्वापर प्रकल्पांची उभारणी यांवर भर देणार.
- कचरा व्यवस्थापन - कचरा व्यवस्थापन, कचऱ्याचा पुनर्वापर, जलस्रोतांमधील प्लॅस्टिक प्रदूषण रोखणे यासाठी प्रयत्न करणार.
- शाश्वत विकास - पर्यावरणाची काळजी घेत, सामाजिक समानतेचे उद्दिष्ट ठेवून संतुलित आर्थिक विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवणार.
- पर्यावरण शिक्षण - पर्यावरणविषयक जाणिवा विकसित होण्यासाठी पर्यावरणीय शिक्षण आणि जागरूकता कार्यक्रम घेणार. नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षणाचे भान निर्माण करून पर्यावरणसंवर्धनातील लोकसहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करणार.
- नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन - नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याची क्षमता वाढविण्यावर भर देणार. नैसर्गिक आपत्तीच्या हानीची तीव्रता कमी करण्यासाठी पूर्वसूचना देणारी यंत्रणा उभारणार. आपत्ती काळात जोखीम कमी करणे, तातडीचे मदतकार्य हाती घेणे यासाठी नागरिकांना प्रशिक्षित करणार.
- आंतरराष्ट्रीय सहभाग - आंतरराष्ट्रीय पर्यावरणीय कार्यामध्ये सहभागी होणार. पर्यावरणपूरक खंडीय-आंतरखंडीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणार.
- पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र - हिमालय परिसरातील बांधकामांचा परिणाम तपासण्यासाठी आणि बांधकामांचे दुष्परिणाम रोखण्यासाठी समिती स्थापन करणार.

- राज्यांचा सहभाग - जल-वायू गुणवत्ता, नद्या, जंगले इत्यादींच्या रक्षणाकरिता राज्या-राज्यांमध्ये समन्वय असला पाहिजे. या दृष्टीने केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारे यांच्यात समन्वय साधणार.
- एकात्मिक जल नियोजन - पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवू नये यासाठी जलस्रोतांचे संवर्धन, पाण्याचे वाटप आणि वापर यासंबंधी सर्वसमावेशक राष्ट्रीय जल व्यवस्थापन धोरण आखणार.
- जलस्रोत पायाभूत सुविधा विकास - सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता सुधारण्यासाठी स्वच्छ पाणीपुरवठा, सांडपाणी प्रक्रिया, पुनर्वापर इत्यादींसाठी सर्व राज्य सरकारांच्या मदतीने पायाभूत सुविधांचा विकास करणार.
- जलसंधारण - रेन वॉटर हार्वेस्टिंग, पाण्याची क्षारता रोखणारी उपाययोजना, पाण्याचा पुनर्वापर आणि भूजल पुनर्भरण यांवर भर देणार.
- जल गुणवत्ता नियमन - जलप्रदूषण रोखण्यासाठी कडक कायद्यांची निर्मिती व अंमलबजावणी करणार. स्वच्छता मानकांचे पालन करणार.
- जलव्यवस्थापनासाठी तंत्रज्ञान - पाण्याचा काटेकोर वापर, जलस्रोत व्यवस्थापन, पाणी वापरातील नासाडी टाळणे यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार.
- लोकसहभाग - प्रभावी जलव्यवस्थापन, जलप्रदूषण रोखणे, जलस्रोतांची स्वच्छता इत्यादींसाठी समाज, तज्ज्ञ आणि व्यावसायिक संस्था यांना एकत्र आणणार.

# पर्यटन, कला आणि संस्कृती

**भारताची अद्वितीय कला, बहुरंगी वारसा आणि वैविध्यपूर्ण संस्कृती यांचे दर्शन जगाला घडविण्यासाठी, पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. त्याचसोबत पारंपरिक कलांचे पुनरुज्जीवन करून त्या माध्यमातून ग्रामीण भारतातील कारागिरीला प्रोत्साहन देण्याचे आमचे धोरण आहे. या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि रोजगारनिर्मिती होईल.**

- प्राचीन वास्तूंचे संवर्धन करणार, परिसर स्वच्छ आणि सुरक्षित ठेवणार. चांगल्या सुविधा देणार.
- ऐतिहासिक वास्तूंचे जतन करणार, साहसी प्रकल्प, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणार.
- स्थानिक खाद्यपदार्थ, कला, हस्तकला, नृत्य आणि संगीत यांचा प्रचार व प्रसार करणार.
- ब्रँडिंग आणि मार्केटिंग करणार.
- वैद्यकीय पर्यटन, आयुर्वेद आणि निसर्गोपचाराशी संबंधित आरोग्य पर्यटन, योग पर्यटन, आध्यात्मिक पर्यटन इत्यादींवर लक्ष केंद्रित करणार.
- सांस्कृतिक वारशाचा प्रचार आणि जतन करणे, कला आणि कलाकारांना पाठिंबा देणे, मनोरंजन उद्योगाच्या वाढीस प्रोत्साहन देणे आणि देशाच्या एकूण सांस्कृतिक लँडस्केपमध्ये वाढ करणे यांवर लक्ष देणार.
- सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि कला व कलाकारांना आर्थिक साहाय्य, शिष्यवृत्ती आणि फेलोशिपद्वारे त्यांच्या सर्जनशील प्रयत्नांना आणि उपजीविकेसाठी समर्थन देण्यासाठी वचनबद्ध आहोत.
- कलाकारांना व्यासपीठ मिळावे यासाठी थिएटर, ऑडिटोरियम, संग्रहालये, आर्ट गॅलरी इत्यादी सांस्कृतिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणार.
- पारंपरिक कला, लोकसंगीत, नृत्य आणि हस्तकला पुनरुज्जीवित करणे आणि प्रोत्साहन देण्यास वचनबद्ध आहोत. चित्रपट उद्योगाच्या वाढीसाठी प्रयत्न करणार.

- कलाकार, लेखक आणि निर्मात्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कॉपीराईट कायदे आणि बौद्धिक संपदा अधिकार मजबूत करणार.
- विद्यार्थ्यांमध्ये कला, वारसा आणि सांस्कृतिक मूल्यांचे संगोपन करण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात सांस्कृतिक शिक्षणाचा समावेश करणार.
- आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताचा सांस्कृतिक वारसा आणि समकालीन सर्जनशील कामगिरीचे प्रदर्शन करण्यास प्रोत्साहन देणार.
- हस्तकला आणि इतर कलांना प्रोत्साहन देणार.
- कलाकारांना पेन्शन आणि सामाजिक सुरक्षा देण्याची मागणी करणार.
- लाखो कारागीर व विणकरांच्या विकासासाठी प्रयत्न करणार. टिकाऊ आणि पर्यावरणपूरक कापड उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी हातमाग क्षेत्राला प्रोत्साहन देणार.
- आर्थिक साहाय्य, क्रेडिट सुविधा, कौशल्य विकास, आधुनिक डिझाईन इनपुट, विपणन समर्थन, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील विस्तार, हातमाग उत्पादनाच्या आधुनिकीकरणासाठी योग्य तंत्रज्ञान यासाठी साहाय्य करणार.
- हातमाग क्लस्टर्सच्या निर्मितीची मागणी करणार, ज्यामुळे त्यांना कच्चा माल, उत्पादन, ब्रँडिंग आणि विपणनास मदत होईल.
- हातमाग विणकरांसाठी आरोग्य विमा, पेन्शन योजना आणि सामाजिक सुरक्षा लाभ यांसारख्या कल्याणकारी उपायांची मागणी करणार.

## राष्ट्रीय सुरक्षा

**आपला देश सर्व नागरिकांसाठी सुरक्षित आणि अभेद्य राखण्याची हमी आम्ही देतो. देशाच्या सुरक्षेचे उपाय कडक करणे आणि कोणत्याही धोक्यापासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी अंतर्गत सुरक्षेला प्राधान्य देणे, ही आमची प्राथमिकता आहे. अग्निपथ योजना मागे घेण्याची मागणी करणार. सैनिकांना सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी लष्कर, नौदल आणि हवाई दलात सामान्य भरतीचा आग्रह धरणार. सशस्त्र दलात महिलांसाठी संधी वाढविणार.**

- संरक्षण क्षमता - अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशाची सुरक्षा व्यवस्था मजबूत करणार आणि कडक धोरणांची अंमलबजावणी करणार.
- दहतशतवाद विरोध - दहशतवादविरोधी उपाययोजना मजबूत करणार.
- सीमा सुरक्षा - देशाच्या सर्व सीमांच्या रक्षणासाठी सीमांवरील पायाभूत सुविधांचा विकास करणार. सीमा बळकट करणार. सीमेपलीकडून होणारी तस्करी, बेकायदा इमिग्रेशन आणि घुसखोरी रोखण्यासाठी पाळत ठेवणार.
- सागरी आणि सायबर सुरक्षा - सागरी सुरक्षा व्यवस्था अद्ययावत करणार. डिजिटल विश्वातील संभाव्य धोके टाळण्यासाठी सायबर सुरक्षा क्षमता मजबूत करण्याची मागणी करणार.
- आपत्ती निवारण - संकटकाळात तातडीने प्रतिसाद देऊन संकट निवारण करणे. कोणत्याही संकटाला तोंड देण्याची क्षमता निर्माण करणे याकडे लक्ष देणार.

# अंतर्गत सुरक्षा

**ईशान्येकडील राज्यांमधील आणि वांशिक मुद्द्यांवर विशेषतः मणिपूरशी संबंधित समस्या संसदेत मांडण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. सीमापार तस्करी आणि घुसखोरी रोखण्यासाठी सीमा सुरक्षा उपाय अधिक कडक केले जातील. जातीय हिंसाचार आणि प्रमुख गुन्ह्यांचा कठोरपणे बिमोड करणार.**

- जातीय संघर्ष, द्वेषपूर्ण गुन्हे आणि द्वेषयुक्त भाषणे, मॉब लिंचिंग आणि सर्वसाधारणपणे महिला, अनुसूचित जाती-जमाती आणि अल्पसंख्याकांवरील वाढते गुन्हे यांतील गुन्हेगारांवर कठोर कारवाई करणार.
- आधुनिक तंत्रे आणि उपकरणे वापरण्याचे प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा सुधारणार. गुप्तचर डेटाचे अधिक चांगले सामाईकरण करून पोलिस दलासह कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना बळकटी देणार.
- महिला, मुले, अल्पसंख्याक आणि उपेक्षित घटकांसह मानवी तस्करी, सांप्रदायिक हिंसा आणि द्वेषपूर्ण गुन्हे यांसारख्या धोक्यांपासून असुरक्षित गटांना संरक्षण करणार.

# परराष्ट्र धोरण

**शांततापूर्ण सह-अस्तित्वाच्या धोरणाला चालना देणार. प्रादेशिक अखंडता आणि सार्वभौमत्वाचा परस्पर आदर राखणार. वादग्रस्त-आक्रमक गोष्टींमध्ये हस्तक्षेप नसणार. समानता आणि परस्पर फायद्याचे मूलतत्त्व राबविणार.**

- सार्वभौमत्व, समानता आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर या तत्त्वांचे पालन करताना जागतिक स्तरावर भारताचे हित जपण्यासाठी शांतता, समृद्धी, सहकार्याला चालना देण्यासाठी प्रयत्नशील राहणार.
- धोरणात्मक भागीदारी वाढविताना भारताच्या राष्ट्रीय हित रक्षणास प्राधान्य देणार.
- सांस्कृतिक देवाण-घेवाणीच्या माध्यमातून भारताचा समृद्ध वारसा आणि मूल्ये जागतिक स्तरावर पोहोचविणार.
- शेजारी राष्ट्रांशी संबंध मजबूत करणार.
- दहशतवादाचा सामना करण्यासाठी जागतिक सहकार्य वाढविणार.
- चीनसोबतच्या सीमावादावर मुत्सद्दीपणाने मार्ग काढून भारतीय सीमा आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणार.
- सहिष्णू, मानवाधिकारांचा आदर करणारा देश आणि लोकशाही मूल्ये मानणारे राष्ट्र ही भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा अधिक दृढ करणार.

# लोकशाही मूल्यांचे रक्षण

**आमचा असा विश्वास आहे, की संघवाद हे भारताचे मूलभूत तत्त्व आहे, जेथे केंद्र सरकार आणि राज्यांमधील अधिकारांचे विभाजन आणि भारतीय राज्यघटनेत नमूद केल्याप्रमाणे स्थानिक सरकारांच्या भूमिकेचा आदर करणे आवश्यक आहे. संविधानाचा हा मूलभूत सिद्धांत सध्याच्या भाजपा/एनडीए सरकारच्या काळात धोक्यात आला आहे. त्यामुळे राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकचे कार्यकारी, आर्थिक आणि प्रशासकीय अधिकार दिले जावेत, हा आमचा आग्रह आहे. न्यायिक सुधारणांना आम्ही प्राधान्य देतो. न्याय मिळविणे आणि न्यायव्यवस्थेत सर्वसमावेशक प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू.**

- सांविधानिक तत्त्वांची जपणूक - लोकशाहीच्या मूळ मूल्यांची जपणूक करणार. कायद्याचे राज्य आणि मूलभूत अधिकार ही तत्त्वे आमच्या शासनाचा पाया असतील.
- हुकूमशाहीविरुद्ध संरक्षण - कोणत्याही प्रकारच्या हुकूमशाही आणि अतिरेकाविरोधात ठाम उभे राहणार.
- स्वातंत्र्यांचे रक्षण - भाषण, अभिव्यक्ती आणि सहकार्य या स्वातंत्र्याचे रक्षण करणार. मतभेदांचाही आदर करणार.
- लोकशाही संस्थांना बळ - न्यायपालिका, निवडणूक आयोग आणि इतर घटनात्मक संस्थांच्या स्वातंत्र्याचा आदर करून त्यांना बळ देणार.
- प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य - लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणाऱ्या प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य अबाधित राखणार.
- 'वन नेशन, वन इलेक्शन' नाकरणार - घटनात्मकदृष्ट्या निश्चित केलेले वेगवेगळ्या निवडणुकींचे वेळापत्रक कायम ठेवणार. 'वन नेशन, वन इलेक्शन' धोरण नाकारणार.
- निवडणुकीचे पावित्र्य : पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त आणि गैरव्यवहाररहित निवडणूक प्रक्रियेला चालना देणार.
- लोकसहभागाला प्रोत्साहन - समाज, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांची लोकशाही व सामाजिक न्यायाला चालना देणारी भूमिका लक्षात घेऊन त्यांचे समर्थन करणार.
- भेदभावयुक्त कायद्यांचे पुनरावलोकन - घटनात्मक तरतुदींच्या विरोधात असणाऱ्या सीएए, एनआरसी, युएपीए आणि अन्य काही कायद्यांचे पुनरावलोकन करून आवश्यक बदल करणार.
- कायद्यांची तपासणी - शेतकरी, कामगार, पर्यावरण, फौजदारी न्याय आणि डिजिटल डेटा संरक्षणासंबंधी अलीकडच्या दशकात संसदीय प्रक्रियेशिवाय मंजूर केलेल्या कायद्याचे पुनर्मूल्यांकन करणार.

**संघरचनेच्या गाभ्याचे रक्षण**

- राज्य आणि स्थानिक संस्थांना बळ - राज्य आणि स्थानिक संस्थांना अतिरिक्त कार्यकारी, आर्थिक आणि प्रशासकीय अधिकार बहाल करणार.
- विकेंद्रीकरणाचे पुनरावलोकन : अधिकारांचे विकेंद्रीकरण घटनात्मक चौकटीतच केले गेले आहे अथवा नाही, याची खातरजमा करणार.
- वित्त आयोग सहयोग - केंद्रीय कर महसूल वितरणाद्वारे राज्यांना मिळणारा वाटा आणि स्थानिक सरकारांना होणारे थेट वितरण यांचा वित्त आयोगासोबत आढावा घेणार.
- घटनात्मक दुरुस्त्या - स्थानिक सरकारचे अधिकार मान्य करून ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती लागू करणार.
- राज्याचा दर्जा : पूर्वी वचन दिल्यानुसार अथवा विचाराधीन असल्यानुसार संबंधित प्रदेशाला राज्याचा दर्जा आणि विशेष राज्य दर्जा पुन्हा बहाल करणार. जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल कर णार.
- वैधानिक दुरुस्त्या - केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाशी संबंधित सुधारणांची अंमलबजावणी करणार, जेणेकरून त्यांच्या स्थानिक स्वायत्ततेचा आदर केला जाईल. तसेच स्थानिक मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार त्यांना कामकाज करता येईल.

**जबाबदारी आणि पारदर्शकता**

- संदिग्ध धोरणे आणि करारांची चौकशी - नोटबंदी, संरक्षण व्यवहार, पाळत ठेवल्याचे आरोप, लाभार्थी निश्चित करण्यासाठी वित्तीय संस्थांचा केलेला गैरवापर इत्यादी संदिग्ध धोरणे आणि करारांची चौकशी करणार.

- कायद्याचा गैरवापराचा - कायद्याचा शस्त्राप्रमाणे केलेला गैरवापर, गैर-न्यायिक हेतूंसाठी तपास यंत्रणांचे केलेले शोषण यांची तपासणी करणार.
- गुन्हेगारांचा मागोव - गुन्हेगारांना देशाबाहेर पळून जाण्यासाठी मदत करणाऱ्या यंत्रणांची चौकशी करून त्यांच्या विरोधातील कायदेशीर प्रक्रियेसाठी प्रत्यार्पणाला चालना देणार.
- राजकीय कवच काढणार - राजकीय हेतूने सौम्य केलेल्या किंवा तपास थांबविण्यात आलेल्या गुन्हेगारी आरोपांची तपासणी करणार.

### न्यायव्यवस्था

- न्यायिक सुधारणा - न्यायव्यवस्था मजबूत करणाऱ्या उपायांची अंमलबजावणी करणार. कायदेशीर प्रक्रिया सुलभ होण्यासाठी आणि जलद न्याय निवाड्यासाठी न्यायिक वितरण प्रणालीत सुधारणा करणार.
- न्यायाधिकार - कायदेशीर मदत मिळवून देणारे उपक्रम वाढविणार. न्यायदानाला गती देण्यासाठी पर्यायी विवाद निराकरण यंत्रणा विकसित करणार.
- सर्वसमावेशक प्रतिनिधित्व - न्यायव्यवस्थेत महिला, अनुसूचित जाती-जमाती आणि उपेक्षित गटांचे प्रतिनिधित्व वाढविणार.

### माध्यमे

- मुक्त संवाद - घटनेने बहाल केलेल्या भाषण आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याला संरक्षण देणारे धोरण आणणार.
- प्रसारमाध्यमांचे रक्षण - अवाजवी दबावात न येता प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य अबाधित राहील, याची काळजी घेणार.
- माहिती उपलब्धता - अचूक आणि निःपक्षपाती माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध होण्यासाठीच्या उपायांना समर्थन देणार.
- माध्यम नियमन - निःपक्ष आणि जबाबदार प्रसारमाध्यमांना प्रोत्साहन देण्यासाठी माध्यम नियमांमध्ये सुधारणा करणार.
- शोध पत्रकारितेला पाठबळ - माहितीची सत्यता आणि लोकशाही प्रक्रियेची अखंडता टिकवून ठेवण्यासाठी शोध पत्रकारितेला ठोस पाठबळ देणार.

# काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील प्रमुख मुद्दे




काँग्रेसने प्रसिद्ध केलेला लोकसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा (न्याय पत्र) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार सहर्ष स्वीकार करीत आहे.

## शेतकरी न्याय

**योग्य किंमत**

- स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार MSP ला कायदेशीर दर्जा.

**कर्जमाफी**

- शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी कायमस्वरूपी आयोग.

**विमा रकमेचे थेट हस्तांतर**

- पीक नुकसान झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत विमा रकमेचे थेट हस्तांतर.

**योग्य आयात-निर्यात धोरण**

- शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आणि स्थिर धोरण.

**जीएसटी मुक्त शेती**

- शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवरील जीएसटी हटविला जाणार.

## युवा न्याय

**भरती विश्वास**

- केंद्र सरकारच्या दिनदर्शिकानुसार ३० लाख नवीन नोकऱ्या.

**पहिली नोकरी पक्की**

- प्रत्येक शिक्षित तरुणाला वार्षिक रु. १ लाख (रु. ८,५०० प्रति महिना).

**पेपर लीकपासून मुक्ती**

- पेपर लीक पूर्णपणे थांबविण्याचे धोरण.

**गिग अर्थव्यवस्थेत सामाजिक सुरक्षा**

- गिग इकॉनॉमिकमध्ये तरुणांसाठी उत्तम कामाची परिस्थिती.

**युवा रोशनी**

- युवकांसाठी ५,००० कोटी रुपयांचा स्टार्टअप निधी.

## महिला न्याय

**महालक्ष्मी**

- गरीब कुटुंबातील एका महिलेला वार्षिक १ लाख रुपये.

**अर्धी लोकसंख्या, पूर्ण अधिकार**

- केंद्र सरकारमधील नवीन भरतीमध्ये ५० टक्के महिला आरक्षण.

**शक्तीचा आदर**

- आशा, अंगणवाडी आणि माध्यान्ह भोजन बनविणाऱ्या महिलांच्या पगारात केंद्र सरकारचे योगदान दुप्पट.

**अधिकार मैत्री**

- महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती देण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एक मैत्री अधिकारी.

**सावित्रीबाई फुले वसतिगृह**

- नोकरदार महिलांसाठी वसतिगृहांची संख्या दुप्पट.

## कामगार न्याय

**आरोग्य अधिकार**

- मोफत आवश्यक निदान. औषधे, उपचार, शस्त्रक्रिया, पुनर्वसन उपचार आणि उपचारांचा अधिकार.

**श्रमाचा अधिकार**

- 'मनरेगा' कामगारांसाठी राष्ट्रीय वेतन किमान ४०० रुपये प्रतिदिन.

**शहरी रोजगार हमी**

- शहरी भागासाठी रोजगार हमी कायदा.

**सामाजिक सुरक्षा**

- असंघटित कामगारांसाठी जीवन आणि अपघात विमा.

**सुरक्षित रोजगार**

- मुख्य शासकीय कामांमध्ये कंत्राटी पद्धत बंद होणार.

## भागीदारी न्याय

- सर्वेक्षण - व्यापक, सामाजिक, आर्थिक आणि जातिगणना.
- आरक्षणाचा अधिकार - अनुसूचित जाती/जमाती, इतर मागास वर्ग आरक्षणावरील ५० टक्क्यांची मर्यादा काढणार.
- अनुसूचित जाती/जमातींसाठी कायदेशीर हमी - लोकसंख्येनुसार अनुसूचित जाती/जमाती उप-योजना. अनुसूचित जाती/जमाती उप-अर्थसंकल्पाची कायदेशीर हमी.
- जल, जंगल, जमीन यांचे कायदेशीर हक्क - वन हक्क कायद्यांतर्गत प्रलंबित दाव्यांचे एक वर्षाच्या आत निराकरण.
- तुमची जमीन, तुमचे रहस्य - अनुसूचित जाती हा सर्वात मोठा सामाजिक समूह आहे. त्यांच्यासाठी अनुसूचित क्षेत्र घोषित करणार.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
# शरदचंद्र पवार

## जाहीरनामा समिती



**Adv. Vandana Chavan,**
Chairperson,
Manifesto Committee

- राजेश टोपे
- सुनील भुसारा
- ॲड. जयदेव गायकवाड
- ॲड. निर्मला सामंत-प्रभावळकर
- बसवराज पाटील नग्राळकर
- सुधीर भोंगळे
- विद्या चव्हाण
- राखी जाधव
- क्लाईड क्रेस्टो
- विकास लवांडे
- नीरज महांकाळ
- ॲड. संजय काळबांडे
- विवेक क्षीरसागर
- सुनील जगताप
- सक्षणा सलगर
- जावेद हबीब
- प्रिया पाटील
- मकरंद कुलकर्णी
- रवींद्र पवार, समन्वयक

## आघाडी प्रमुख



**रोहिणी खडसे**
महिला आघाडी



**सक्षणा सलगर**
युवती आघाडी



**मेहबूब शेख**
युवक आघाडी



**राज राजापूरकर**
ओबीसी सेल



**हिरालाल राठोड**
व्हिजेएनटी सेल



**पंडित कांबळे**
सामाजिक न्याय सेल



**जावेद हबीब**
अल्पसंख्याक सेल



**सुनील गव्हाणे**
विद्यार्थी आघाडी



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

प्रकाशक : सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार | मुद्रक : आकृती प्रिंट सोल्युशन्स प्रा. लि., पर्वती, पुणे ४११ ००९
| प्रती : ५०० | प्रसिद्धी दिनांक : २४ एप्रिल २०२४